# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ७७-२२** **दिनांक - ०७/०३/२०२२**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत महीला दिनाचे औचित्य साधुन महिलांच्या तक्रारी सोडवण्यासाठी भरोसा कक्ष, वसई-विरार येथे स्थापन

मिरा-भाईंदर, वसई-विरार शहराची वाढती लोकसंख्या व महिला हिसांचार/कौटुंबिक हिसांचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभुमीवर महिलांच्या तक्रारींना प्राधान्य देणे, त्यांना समुपदेशन करुन मानसिक आधार देणे व त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे याकरीता मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांच्या संकल्पनेतुन मा. पोलीस उप आयुक्त, वसई कार्यालय, वसई स्टेशन जवळ, वसई (प.) येथे मा. पोलीस आयुक्त सो यांचे हस्ते भरोसा सेल, वसई या कक्षाच्या उद्घाटनचा कार्यक्रम दि.०७.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. संपन्न झाला.

भरोसा कक्षाच्या माध्यंमातुन मुख्यत्वे करुन महिलांशी संबंधित तक्रारींचे निवारण केले जाणार आहे. तसेच कौटुंबिक वाद-विवाद/कलह समोपचाराने कसे सोडवता येईल? यादृष्टीने भरोसा कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार काम पाहणार आहेत.

वसई-विरार परिमंडळ ०२ व ०३ मधील पोलीस ठाण्यात महिलांच्या संबंधित तक्रारी भरोसा कक्ष वसई-विरार येथे पाठविण्यात येणार आहेत. कक्षामध्ये महिला पोलीस अधिकारी, समुपदेशक, मानसोपचार तज्ञ, एन.जी.ओ., एम.एस.डब्ल्यु., वकिल व संरक्षण अधिकारी यांचा सामावेश असून महिलांच्या समस्या जाणून घेवून समोपचाराने वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

सदर कार्याक्रमाचेवेळी “महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचे हक्क व अधिकार” या पुस्तिकेचे प्रकाशन मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते सर यांचे हस्ते करण्यात आले.

सदर पुस्तिकेचे संकलन सपोनि/तेजश्री शिंदे यांनी केले असुन सदर पुस्तिकेमध्ये महिलांचे, बालकांचे व जेष्ठ नागरिकांचे हक्क व अधिकार यांची माहिती सविस्तर स्वरुपात देण्यात आली असुन त्यांच्याशी संबधित कायदेविषयक माहितीदेखील देण्यात आली आहे. महिला,बालके व जेष्ठ नागरिक यांचेकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. उदारणार्थ डायल-११२, भरोसा सेल, बडी कॉप, पोलीस दिदी, पोलीस काका, इ. सदरची पुस्तिका ही भरोसा सेल येथे मोफत वाटपासाठी ठेवण्यात आलेली आहे. तसेच मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवरती देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर कार्याक्रमासाठी अप्पर पोलीस आयुक्त, श्री एस. जयकुमार, डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त, गुन्हे, श्री संजय पाटील, पोलीस उप आयुक्त, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस उप आयुक्त, श्री. देशमुख, सहा. पो. उप आयुक्त, व वसई-विरार परिमंडळ २ व ३ मधील सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मसपोनि. तेजश्री शिंदे- भरोसा सेल, भाईदर पोलीस अधिकारी व अंमलदार, तसचे मसपोनि. अर्चना कोळी-भरोसा सेल,वसई, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

-------------oo-----------------